




# दैनिक आरंभपर्व

आरंभ एका नव्या पर्वाचा

Epaper : www.aparv.com

**1,22,570** डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे पुण्यातील लोकप्रिय दैनिक



● वर्ष : ०२ ● अंक : २२४ ● पुणे ● शुक्रवार, दि. १८ जुलै २०२५ ● मराठी दैनिक ● पाने ४ ● किंमत : २ रूपये ● RNI No.-MAHMAR/2023/89313




तृप्ती देसाई यांचा सरकारवर घणाघात 3



दैनिक 'आरंभ पर्व'च्या बातमीचा परिणाम 4

## ठळक बातम्या



### नीतू चंद्रा बनल्या बिहार निवडणूक आयोगाचा 'आयकॉन फेस'

**मुंबई (आरंभ पर्व) : बिहार निवडणूक आयोगाने घेतलेल्या एका महत्त्वाच्यानिर्णयानुसार, आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रशंसित अभिनेत्री आणि राष्ट्रीयपुरस्कार विजेत्या निर्मात्या नीतू चंद्रा यांची बिहारच्या 'आयकॉन फेस' म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. ही ऐतिहासिक नियुक्ती केवळ एकसन्मान नाही, तर एका अशा नागरिकाचा उत्सव आहे ज्यांनी वैश्विक, राष्ट्रीय आणि सांस्कृतिक स्तरांवर बिहारची ओळख सातत्याने उंचावलीआहे. नीतू चंद्रा फक्त बिहारचा चेहरा नाहीत, तर बिहारचा गौरव आहेत. पटनामधील सामान्य सुरुवातीपासून ते हॉलिवूडच्या चमकदार रेडकार्पेटपर्यंत, त्यांचा प्रवास असामान्य आहे. सिनेमा, खेळ, सांस्कृतिकवारसा आणि सामाजिक प्रभावातील त्यांचे योगदान त्यांना निवडणूकमोहिमेदरम्यान लाखो लोकांना प्रेरणा देण्यासाठी सर्वात योग्य आणि सशक्त पर्याय बनवते.**



### 'त्रिशरण'चे प्रशांत वाघमारे यांची निवड

**पुणे (आरंभ पर्व) : महाराष्ट्र शासनाच्या नगरपरिषद आणि प्रादेशिक संचालनालयाच्या 'दीनदयाल जनआवास योजना-शहरी विभाग' अंतर्गत राज्यस्तरीय निवारा सनियंत्रण समितीमध्ये पुण्यातील त्रिशरण एनलायटन्मेन्ट फाउंडेशनचे राज्य व्यवस्थापक प्रशांत वाघमारे यांची निवड झाली आहे. 'त्रिशरण'च्या माध्यमातून प्रशांत वाघमारे यांनी महाराष्ट्रातील ३६ जिल्ह्यांमध्ये बेघर निवारा केंद्रांचे अत्यंत अचूक आणि पारदर्शक निरीक्षण यशस्वीपणे पार पाडले. त्यांच्या असाधारण नेतृत्व आणि प्रामाणिक कार्याची दखल घेत ही निवड करण्यात आली आहे. महाराष्ट्रात सध्या कार्यरत असलेल्या ८७ बेघर निवारा केंद्रांच्या सुधारणेसाठी आणि व्यवस्थापनासाठी त्यांचा हा सहभाग महत्त्वपूर्ण ठरणार आहे. या समितीतील त्यांचा सहभाग राज्यातील बेघरांसाठीच्या निवारा योजनेच्या अंमलबजावणीला नवा आयाम देणार असून, सुधारित सुविधा आणि प्रभावी व्यवस्थापनाच्या दिशेने मोलाचा हातभार लावेल. ही निवड सामाजिक सेवेत एक प्रेरणादायी पाऊल मानले जात आहे.**

# पत्रकारांना अपशब्द वापरणे आणि शिवीगाळ करणे हा गुन्हाच

## कायदा आणि शासनाची स्पष्ट भूमिका

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

माध्यमे म्हणजे लोकशाहीचा चौथा स्तंभ. समाजातील अन्याय, भ्रष्टाचार आणि जनतेच्या समस्यांकडे सरकारचे लक्ष वेधणारे पत्रकार हे केवळ बातमीसाठी धावणारे नाहीत, तर ते एक सामाजिक जबाबदारी पार पाडणारे कार्यकर्तेही आहेत. त्यामुळे पत्रकारांवर होणारी अपमानास्पद वागणूक, शिवीगाळ, धमक्या आणि मारहाणीच्या घटनांकडे शासन अत्यंत गांभीर्याने पाहते.

पत्रकारांना अपशब्द वापरणे, अपमानित करणे किंवा धमकी देणे हा केवळ असभ्यपणा नसून गंभीर दखलपात्र आणि अजामीनपात्र गुन्हा ठरतो.

**महाराष्ट्रातील कायदेशीर संरक्षण : पत्रकार संरक्षण कायदा, 2017**

महाराष्ट्र हे भारतातील पत्रकार संरक्षण कायदा लागू करणारे पहिले आणि एकमेव राज्य आहे.

७ एप्रिल २०१७ रोजी हा कायदा विधानसभेत मंजूर करण्यात आला, तर ८ डिसेंबर २०१९ पासून तो प्रत्यक्षात लागू करण्यात आला.

या कायद्याअंतर्गत खालील तरतुदी करण्यात आल्या आहेत:

**१. शिक्षा आणि दंड**

पत्रकारावर हल्ला करणाऱ्यास ३ वर्षांपर्यंत तुरुंगवास आणि ५०,००० रुपयांपर्यंतचा दंड, किंवा दोन्ही शिक्षा होऊ शकतात.

**२. गुन्ह्याचे स्वरूप**

अशा प्रकारचे गुन्हे हे दखलपात्र (Cognizable) आणि अजामीनपात्र (Non-Bailable) असतात.

म्हणजेच, पोलिसांना वॉरंटशिवाय



अटक करण्याचा अधिकार असतो आणि जामीन लगेच मिळू शकत नाही.

**३. नुकसानभरपाई**

जर एखाद्या पत्रकाराला किंवा मीडिया संस्थेच्या कार्यालयाला नुकसान पोहचवलं गेलं, तर त्या नुकसानाची भरपाई गुन्हेगाराकडून वसूल करण्याची तरतूद आहे.

**४. तपासाची जबाबदारी**

पत्रकारांवरील हल्ल्याची चौकशी DYSP (उपविभागीय पोलीस अधिकारी) स्तरावर होते.

**IPC अंतर्गत अन्य कायदेशीर कारवाई**

महाराष्ट्र पत्रकार संरक्षण कायद्याशिवाय, भारतीय दंड संहितेच्या (IPC) विविध कलमानुसार पत्रकारांवर होणाऱ्या अपशब्द, धमक्या आणि मारहाणीवरही कारवाई केली जाते:

कलम 323: मारहाण – १ वर्ष कारावास / दंड / दोन्ही

कलम 504: शांततेचा भंग करणारा अपमान – २ वर्ष कारावास / दंड / दोन्ही

कलम 506: जीवे मारण्याची किंवा गंभीर इजा करण्याची धमकी – कठोर शिक्षा

**सर्वोच्च न्यायालयाचा स्पष्ट आदेश**

फक्त शिवीगाळ केल्याने IPC कलम 294(ब) अन्वये गुन्हा होत नाही, परंतु ती शिवीगाळ जर शांतता भंग करण्याच्या हेतूने, धमकीच्या स्वरूपात किंवा सार्वजनिक ठिकाणी केली असेल, तर ती दंडनीय गुन्हा ठरतो.

**पत्रकारांवरील हल्ल्यांचे उदाहरण: सामाजिक जबाबदारीचा अपमान**

अनेक वेळा पत्रकारांनी समाजातील महत्त्वाच्या प्रश्नांवर प्रश्न उपस्थित केल्याने त्यांना धमक्या, अपशब्द किंवा मारहाणीचा सामना करावा लागतो. ही कृती केवळ त्या पत्रकारावरील हल्ला नसून लोकशाही व्यवस्थेवरचा आघात आहे. त्यामुळे अशा घटनांमध्ये पत्रकारांनी तक्रार नोंदवून कायदेशीर संरक्षणाचा लाभ घ्यावा, हे अत्यंत आवश्यक आहे.

पत्रकारांना शिवीगाळ करणे, धमकावणे वा अपमान करणे हे कायद्याने गुन्हा असून, तो करणाऱ्यांवर कडक कारवाईची तरतूद आहे. पोलिसांनी अशा प्रकरणांकडे केवळ तक्रार म्हणून न पाहता, लोकशाही व्यवस्थेच्या सुरक्षेच्या दृष्टीने गांभीर्याने पाहणे गरजेचे आहे.

माध्यमकर्मींचे स्वातंत्र्य टिकवणे ही समाजाची जबाबदारी आहे.

जर माध्यमे अबाधित राहिली, तरच समाजाला खरी माहिती मिळू शकते – आणि म्हणूनच, पत्रकारांना असुरक्षित वाटण्याची वेळ येणे हे कुठल्याही प्रगत लोकशाहीसाठी दुर्दैव आहे.

जर तुम्ही पत्रकार असाल आणि तुमच्याशी गैरवर्तन झाले असेल, तर तातडीने पोलिसांत तक्रार नोंदवा आणि कायदेशीर कारवाईची मागणी करा. तुमचे हक्क सुरक्षित आहेत – तुम्ही एकटे नाही आहात!

## सहकार भारतीच्या साखर कारखाना प्रकोष्ठ जिल्हा प्रमुखपदी भाऊसाहेब आव्हाळे



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

सहकार भारतीच्या पुणे जिल्हा साखर कारखाना प्रमुख प्रकोष्ठ प्रमुखपदी अहिल्यानगर जिल्ह्यातील पारनेर येथे कृषिनाथ ग्रीन एनर्जी साखर कारखान्याचे संचालक भाऊसाहेब आव्हाळे यांची निवड झाली आहे. आळंदी येथे नुकत्याच झालेल्या दोन दिवसीय अभ्यासवर्गावेळी सहकार भारतीचे पुणे विभाग प्रमुख गिरीश भवाळकर यांनी पुणे जिल्ह्याची कार्यकारीणी घोषित केली. सहकार भारती ही १९७८ मध्ये सहकार क्षेत्राच्या उत्थानासाठी स्थापन झालेली संस्था असून गेली ४४ वर्षे या संस्थेचे संपूर्ण देशभरातील पाचशेहून अधिक जिल्ह्यांमध्ये अत्यंत प्रभावीपणे व अविरतपणे कार्य सुरू आहे. सहकार खऱ्या अर्थाने यशस्वी व कार्यान्वित व्हावयाचा असेल, तर त्यातील काम करणारे सर्वच लहान-थोर कार्यकर्ते हे नि:स्वार्थी आणि समाजसेवी वृत्तीचे असले पाहिजेत म्हणून सहकार भारतीने 'बिना सहकार नही उद्धार' या ध्येयवाक्याला 'बिना संस्कार नही सहकार' अशी अर्थपूर्ण जोड दिली आहे, असे गिरीश भवाळकर यांनी स्पष्ट केले.

यावेळी सहकार भारतीचे महाराष्ट्र प्रदेश साखर कारखाना प्रकोष्ठ प्रमुख साहेबराव खामकर यांच्या हस्ते भाऊसाहेब आव्हाळे यांना जिल्हा प्रकोष्ठ प्रमुख, तर सहप्रकोष्ठ प्रमुख म्हणून माजी कार्यकारी संचालक अनंत निकम यांना पत्र दिले. सर्वांचे मार्गदर्शन व अनुभवाची जोड यातून सहकार भारतीद्वारा सहकारी साखर कारखान्यांच्या अडीअडचणी सोडविण्यासाठी आवश्यक ते प्रयत्न केले जातील, अशी भावना भाऊसाहेब आव्हाळे यांनी व्यक्त केली.

## लोकशाहीर अण्णा भाऊ साठे हे मानवतेचे आणि क्रांतीचे प्रतीक

- **रतनलाल सोनग्रा**
- **"क्रांतीपुत्र अण्णा भाऊ साहित्यिकांचा साहित्यिक" या महाचर्चातून उलगडला अण्णा भाऊंचा जीवनप्रवास**
- **शाहीर नंदेश उमाप, अभिनेत्री, रुक्मिणी सुतार, धर्मेंद्र पाटील अण्णा भाऊ साठे स्मृती पुरस्काराने सन्मानित**



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या ५६ व्या स्मृति दिनाच्या निमित्ताने श्रमिक पत्रकार भवन, येथील सभागृहात झोपडपट्टी सुरक्षा दल व महाराष्ट्र कामगार सुरक्षा दल यांच्या वतीने "क्रांतीपुत्र अण्णा भाऊ साहित्यिकांचा साहित्यिक" या विषयावर महाचर्चा करण्यात आली. या प्रसंगी महाचर्चेचे उद्घाटन मा. आमदार लहू कानडे यांनी केले तर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी ज्येष्ठ साहित्यिक रतनलाल सोनग्रा होते. या महाचर्चात जेष्ठ विचारवंत सुरेश दाभाडे, बजरंग कोरडे, अशोक घायाळे यांनी विचार मांडले. कार्यक्रमाचे स्वागताध्यक्ष भगवानराव वैराट हे होते. तसेच या कार्यक्रमात अण्णा भाऊंचे स्मरण ठेवून महाराष्ट्राचे लोक कलावंत सिनेपार्श्वगायक शाहीर नंदेश उमाप तसेच "देवमाणूस" या लोकप्रिय मालिकेतील अभिनेत्री, रुक्मिणी सुतार, प्राणी मित्र धर्मेंद्र पाटील, दलित चळवळीतील अभ्यासू विचारवंत प्राचार्य अरुण गाडे, पुण्याचे ज्येष्ठ पत्रकार, साहित्यिक अविनाश गोडबोले यांना अण्णा भाऊ साठे स्मृती पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे. शाल, श्रीफळ, स्मृतीचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप होते. सोनग्रा म्हणाले की समाजात वावरताना माणसांनी माणसासारखे वागावे. जातिवादाच्या चौकटीतून बाहेर पडून समाजाचा आणि स्वतःचा उद्धार करावा. अनिष्ट चालीरितींना मूठमाती द्याला हवी. घराच्या बाहेर पडताना भारतीय म्हणून बाहेर पडा. स्वतःची जात, धर्म प्रत्येकाने स्वतःपुरताच ठेवावा. शासनाचे सर्व कायदे सर्वांना समान आहेत. सर्वांनी त्याचा आदर करावा. स्वतःच्या अस्मितेवर आलेली काजळी दूर करावी. कायद्यामध्ये, माणसांमध्ये मी भेदाभेद करणार नाही असा निर्धार केला पाहिजे. या देशात धर्मनिरपेक्षतेचा टिकली पाहिजे. राजकिय नैतिकता, टिकली पाहिजे त्याशिवाय समाजवादी भारत तयार होणार आहे.कानडे म्हणाले की मराठी माणसाला या मराठी मातीला तसेच मराठी साहित्यिकांना, मराठी राजकारण्यांनी अण्णा भाऊंचा योग्य तो अभ्यास केलेला आहे ? अण्णाभाऊंची कथांचा महासागर लिहिलेला आहे. अण्णांच्या असंख्य कथा आहेत आणि प्रत्येक कथा १० ते १२ पानाची आहे. अन्नाची कथा कधी फसलेली नाही. सदरील कार्यक्रमाचे सूत्रसंचालन काशीनाथ गायकवाड यांनी केले तर आभार भगवानराव वैराट यांनी मानले.

# कृत्रिम बुद्धिमतेच्या वापराने सनदी लेखापाल अधिक सक्षम

## सीए चरणज्योत सिंग नंदा यांचे प्रतिपादन; 'आयसीएआय'च्या वतीने 'एआय इनोव्हेशन समिट २०२५'

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

"कृत्रिम बुद्धिमतेमुळे (आर्टिफिशियल इंटेलिजन्स-एआय) सर्वच क्षेत्रात क्रांतिकारी बदल होत आहेत. येणारा काळ हा 'एआय'चा असून, भारतीय सनदी लेखापालांना 'एआय'चे ज्ञान व्हावे, त्याचा चांगला उपयोग करता यावा, यासाठी प्रशिक्षण दिले जात आहे. तसेच सीए विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमात 'एआय'चा समावेश केला जात आहे. त्यामुळे सनदी लेखापाल अधिक तंत्रज्ञानाभिमुख व 'एआय' प्रशिक्षित होत आहेत," असे प्रतिपादन दी इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाऊंटंट्स ऑफ इंडियाचे अध्यक्ष सीए चरणज्योत सिंग नंदा यांनी केले.




संसदीय कायद्यानुसार स्थापित दी इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाऊंटंट्स ऑफ इंडिया (आयसीएआय) आयोजित 'एआय इनोव्हेशन समिट २०२५', या सनदी लेखापालांसाठीच्या दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. 'अकाऊंटिंग, ऑडिट, कर प्रणाली आणि शासकीय कार्यपद्धतीत परिवर्तन' अशी या परिषदेची मध्यवर्ती संकल्पना होती. बाणेर येथील बंटारा भवनमध्ये आयोजित या कार्यक्रमावेळी 'आयसीएआय'चे उपाध्यक्ष सीए प्रसन्नकुमार डी, सचिव सीए डॉ. जयकुमार बत्रा, 'आयसीएआय'च्या एआय कमिटीचे चेअरमन सीए उमेश शर्मा, व्हाईस चेअरमन सीए दयानिवास शर्मा, वेस्टर्न इंडिया रिजनल कौन्सिलचे (डब्ल्यूआयआरसी) अध्यक्ष सीए केतन सैय्या, आयसीएआय पुणे शाखेचे चेअरमन सीए सचिन मिणियार आदी व्यासपीठावर उपस्थित होते. 'आयसीएआय'च्या केंद्रीय समितीचे, विभागीय समितीचे, तसेच पुणे शाखेचे पदाधिकारी व १००० पेक्षा अधिक सीए सभासद या परिषदेला उपस्थित होते.

'आयसीएआय'च्या पुणे शाखेच्या वतीने या परिषदेचे संयोजन केले होते. केंद्रीय समिती सदस्य सीए चंद्रशेखर चितळे यांच्या मार्गदर्शनात विभागीय समिती सदस्य सीए राजेश अग्रवाल, सीए रेखा धामणकर, सीए अभिषेक धामणे, पुणे शाखेचे उपाध्यक्ष सीए प्रणव आपटे, सचिव सीए निलेश येवलेकर, खजिनदार सीए नेहा फडके, कार्यकारिणी सदस्य सीए प्रितेश मुनोत, सीए प्रज्ञा बंब, सीए नंदकुमार कदम, सीए सारिका दिंडोकार आदींनी संयोजनात परिश्रम घेतले. आयटी तज्ज्ञ डॉ. दीपक शिकारपूर व ओपनएआय सोर्सच्या पब्लिक पॉलिसी अँड पार्टनरशिप हेड प्रज्ञा मिश्रा यांचे 'एआय'वर बीजभाषण झाले.

सीए चरणज्योत सिंग नंदा म्हणाले, "कृत्रिम बुद्धिमत्ता, मशीन लर्निंग यांसारख्या नव्या तंत्रज्ञानाची भीती न बाळगता ते तंत्रज्ञान आत्मसात करायला हवे. शिकण्याची आसक्ती हवी. 'एआय'मुळे अनेक गोष्टी सहज होत आहेत. केंद्र सरकारने संशोधन व इनोव्हेशनसाठी २० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक केली आहे. विकसित भारताच्या दिशेने टाकलेले हे महत्वपूर्ण पाऊल आहे. तंत्रज्ञानाच्या विस्तारासाठी भारत आंतरराष्ट्रीय बाजारपेठ बनत आहे. या संधींचा सनदी लेखापालांनी लाभ घ्यावा. आज ५०० पेक्षा अधिक 'एआय' प्रशिक्षण वर्ग झाले असून, त्यातून २५ हजार सनदी लेखापालांनी 'एआय' मोड्यूल शिकले आहेत. सनदी लेखापालांनी सकारात्मक मानसिकता ठेवण्यासह शरीर व मनाच्या स्वास्थ्यावर लक्ष द्यावे. कुटुंबाला पुरेसा वेळ द्यावा. 'वर्क लाईफ बॅलन्स' साधण्यासाठी विविध उपक्रम हाती घेण्यात आले आहेत."

सीए प्रसन्नकुमार म्हणाले, "कृत्रिम बुद्धिमत्ता हा आपल्या व्यवसायाचा अविभाज्य भाग बनला असून, 'एआय' आत्मसात केल्याशिवाय कोणताही पर्याय नाही. लाखो सनदी लेखापाल आणि सीए विद्यार्थी हे नवे तंत्रज्ञान वापरत आहेत. त्याचा आणखी प्रभावी वापर कसा करता येईल. नोकऱ्या जाणार ही भीती मनातून काढायला हवी. नवी कौशल्ये, तंत्र आत्मसात करणाऱ्यांसाठी हे संधींचे भांडार आहे. सव्वाकोटी पेक्षा अधिक रोजगार निर्मिती 'एआय'मुळे होणार आहे. मानवी बुद्धिमत्ता श्रेष्ठ असून, त्याला कृत्रिम बुद्धिमतेची जोड मिळाल्याने विकासाचा वेग झपाट्याने वाढणार आहे."

सीए उमेश शर्मा म्हणाले, "गेल्यावर्षी 'आयसीएआय'ने 'एआय कमिटी' स्थापन केल्यापासून कृत्रिम बुद्धिमतेच्या वापराचे प्रशिक्षण अधिक व्यापक झाले आहे. प्रत्येक सनदी लेखापालांना 'एआय' प्रशिक्षित करून काळाबरोबर चालण्यासाठी प्रोत्साहन दिले जात आहे. जवळपास साडेचार ते पाच लाख सनदी लेखापाल येत्या काही महिन्यात हे प्रशिक्षण घेतील. २०२७ नंतर सीए होणाऱ्यांसाठी अभ्यासक्रमात 'एआय'चा विषय शिकवला जाणार आहे."

सीए दयानिवास शर्मा, सीए केतन सैय्या यांनीही आपले विचार मांडले. सीए (डॉ.) जयकुमार बात्रा यांनी स्वागत-प्रास्ताविक केले. सीए नेहा फडके व सीए प्रज्ञा बंब यांनी सूत्रसंचालन केले. सीए सचिन मिणियार यांनी आभार मानले.

# विमान अपघात 'अहवालानंतर'चा वाद




अहमदाबादमध्ये झालेल्या 'एअर इंडिया'च्या विमान अपघाताचा प्राथमिक तपास अहवाल अलीकडेच समोर आला. या अहवालात धक्कादायक गौप्यस्फोट आहेत. मात्र या अहवालावर तज्ज्ञ आणि वैमानिकांच्या संघटनेने आक्षेप घेतला. त्यामुळे केंद्रीय नागरी विमान वाहतूक मंत्र्यांनीही अहवालातून घाईघाईने निष्कर्ष काढू नका, असे जे आवाहन केले, ते अतिशय महत्त्वाचे आहे. नेमके काय घडतेय या प्रकरणात?

अहमदाबाद विमान अपघाताचा प्रारंभिक अहवाल एक महिन्यानंतर जाहीर झाला. त्यातील निष्कर्ष धक्कादायक आहेत. वैमानिकांच्या संवादाचा आधार घेऊन विमानाच्या इंजिनला इंधन पुरवठा करणारे स्विच बंद केल्याने हा अपघात झाला असल्याचे म्हटले आहे. त्यातून वैमानिकांवर खापर फोडण्याचा प्रयत्न झालेला दिसतो. या विमानाचे दोन्ही वैमानिक अनुभवी होते. त्यांच्याकडून अशी चूक होणे संभवत नाही.

'एएआयबी' (एअरक्राफ्ट ॲक्सिडेंट इन्व्हेस्टिगेशन ब्यूरो)ने हा अहवाल प्रसिद्ध केला आहे. हे बोईंग ७८७-८ ड्रीमलाइनर विमान होते. या अपघातात विमानातील २४१ जणांचा मृत्यू झाला, तर बाहेरील १९ जणांचा मृत्यू झाला.

या अपघातात फक्त एकच प्रवासी वाचला. एका वैमानिकाने 'तू स्विच बंद केले का' अशी विचारणा केली, तर दुसऱ्याने 'नाही' असे उत्तर दिले. दोघांपैकी कुणी कुणाला स्विचबाबत विचारले, याचा उलगडा या अहवालातून होत नाही. या अहवालावर वैमानिक संघटनेने संताप व्यक्त केला आहे. समितीत एकही वैमानिक नव्हता आणि त्यांना विश्वासात न घेता आणि तज्ज्ञ वैमानिकाचे म्हणणे न नोंदवताच अहवालात ठपका ठेवण्यात आल्याबद्दल नाराजी व्यक्त करण्यात आली. वैमानिकांची कुटुंबे तसेच अन्य प्रवाशांच्या कुटुंबीयांनीही या अहवालावर नाराजी व्यक्त केली. स्विच कधी बंद करायचा, कधी सुरू करायचा आणि स्विच बंद केला की काय होते याचा परिणाम माहीत असलेले वैमानिक स्वतःसह शेकडो प्रवाशांचा जीव कशाला धोक्यात घालतील, हा प्रश्न उपस्थित केला जात आहे.



अहवालात इंधन 'कटऑफ स्विच' रनवरून 'कटऑफ'मध्ये गेला होता. हा स्विच एका सेकंदात बदलण्यात आला असे म्हटले आहे. दोन्ही इंजिन्सना इंधनपुरवठा थांबला होता. त्यामुळे इंजिनची पॉवर बंद पडली, तेव्हा पंख्यासारखे एक लहान उपकरण आपोआप उघडले. याला 'राम एअर टर्बाइन' (रॅट) म्हणतात. ते आपत्कालीन परिस्थितीत 'हायड्रॉलिक पॉवर' देते. वैमानिकांनी इंजिन पुन्हा सुरू करण्याचा प्रयत्न केला; परंतु कोसळण्यापूर्वी ते सुरू होऊ शकले नाही.

धावपट्टीपासून ०.९ नॉटिकल मैल अंतरावर ते एका वसतिगृहावर कोसळले. 'एएआयबी'च्या अहवालात म्हटले आहे की, वैमानिकांची पात्रता शंकेच्या पलीकडे होती आणि दोघेही निरोगी आणि पूर्णपणे तंदुरुस्त होते आणि त्यांना पुरेसा अनुभव होता. इंधन भरण्याच्या स्त्रोतांमध्येही कोणतीही भेसळ आढळली नाही. हवामान पूर्णपणे स्वच्छ होते. विमान उड्डाण करण्यासाठी फ्लॅप सेटिंग (५ अंश) आणि गियर सामान्य होते. आकाशात पक्षी नव्हते. वाराही हलका होता. दृश्यमानता चांगली होती. कोणत्याही प्रकारची कोणतीही अडचण नव्हती. वजनदेखील संतुलित होते, तरीही अपघात झाला.

इंधन स्विचमध्ये संभाव्य बिघाडाबद्दल 'एफएए'कडून एक सल्ला देण्यात आला होता; परंतु सात वर्षांपूर्वीचा हा सल्ला 'एअर इंडिया'ने विचारात घेतला नाही. त्या वेळी ही कंपनी भारत सरकारच्या मालकीची होती. आताच्या अहवालात म्हटले आहे की, दोन्ही वैमानिकांकडे आवश्यक परवाने होते. त्यांची वैद्यकीय तपासणी करण्यात आली होती. त्यात ते निरोगी आढळले. दोन्ही वैमानिकांना विमान उडवण्याचा चांगला अनुभव होता. 'फेडरल एव्हिएशन ॲडमिनिस्ट्रेशन' ही अमेरिकन सरकारी एजन्सी आणि बोईंग यांनी जारी केलेल्या एका अधिसूचनेत म्हटले आहे, की बोईंग विमानांचे इंधन स्विच लॉक पूर्णपणे सुरक्षित आहेत. इंधन नियंत्रण, स्विचचे डिझाइन, लॉकिंग वैशिष्ट्ये वेगवेगळ्या बोईंग विमानांमध्ये सारखीच आहेत. आम्ही ही धोकादायक परिस्थिती मानत नाही.

अहमदाबाद-लंडन विमान अपघाताच्या प्राथमिक अहवालानंतर 'एफएए' आणि बोईंगने अधिसूचना जारी केली. त्यात इंजिन इंधन कटऑफ स्विचवर प्रश्न उपस्थित करण्यात आले होते. 'एअर इंडिया'ने २०१९ मध्ये 'बोईंग'च्या सूचनांनुसार अहमदाबाद-लंडन बोईंग ७८७-८ उड्डाणाचे थ्रॉटल कंट्रोल मॉड्यूल (टीसीएम) गेल्या सहा वर्षांमध्ये दोनदा बदलले आहे. अहवालात असेही उघड झाले की, उड्डाणापूर्वी फ्लाइटच्या सेन्सरमध्ये समस्या होती. ती दुरुस्त करण्यात आली होती. प्राथमिक अहवालात कोणताही अंतिम निष्कर्ष काढण्यात आलेला नाही. अंतिम अहवाल कदाचित एक किंवा दोन वर्षांनी येईल. त्यात या अपघाताचे खरे कारण कळू शकेल. या विमान अपघातात एकूण २७० लोकांचा मृत्यू झाला. यामध्ये २४१ प्रवासी आणि क्रू मेंबर्सचा समावेश होता. फक्त एक प्रवासी वाचला. १५ पानांच्या अहवालानुसार, टेक ऑफपासून अपघातापर्यंत संपूर्ण उड्डाण फक्त ३० सेकंद चालले. अहवालात बोईंग ७८७-८ विमान आणि इंजिनबाबत कोणत्याही ऑपरेटरला कोणताही इशारा किंवा कारवाई करण्याची शिफारस केलेली नाही. दोन्ही वैमानिक मुंबईचे होते आणि आदल्या दिवशी अहमदाबादला पोहोचले होते. उड्डाणापूर्वी त्यांनी पुरेशी विश्रांती घेतली होती.

# शाळा शिकायची आहे, पण गुरुजीच नाहीत...

## खडकवासला मनपा शाळेत शिक्षकांची कमतरता; विद्यार्थ्यांचे भवितव्य अंधारात!

**पुणे - लक्ष्मण साबळे (दै. आरंभ पर्व)**





पुणे महानगरपालिकेत अलीकडेच समाविष्ट झालेल्या खडकवासला परिसरातील मनपा शाळा क्रमांक १ सध्या गंभीर अडचणीत सापडली आहे. कारण, शाळेमध्ये शिक्षकांची तीव्र कमतरता असून विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. "शिकायचं आहे पण गुरुजीच नाहीत" अशी स्थिती सध्या विद्यार्थ्यांच्या वाट्याला आली आहे.

या शाळेमध्ये एकूण मंजूर पदे ६ असून सध्या केवळ ३ शिक्षक कार्यरत आहेत. यातील तेजस बोरुडे आणि निखिल खरमाळे हे दोन शिक्षण सेवक मागील ६ महिन्यांपासून बिनपगारी रजेवर आहेत. परिणामी केवळ तीन शिक्षक १६० विद्यार्थ्यांची जबाबदारी पार पाडत आहेत. यामध्ये मुख्याध्यापक अमोल माने यांच्यावर देखील दोन वर्गांची जबाबदारी आहे, परंतु प्रशासकीय कामकाज व बैठकांमुळे त्यांनाही सातत्याने वर्गात उपस्थित राहता येत नाही.

सध्या असलेल्या शिक्षकांवर अनेक वर्गांची जबाबदारी असल्याने, प्रत्येक वर्गासाठी वेळ आणि गुणवत्ता देणे अशक्य झाले आहे. पालकांमध्ये संतापाची भावना असून विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भवितव्य धोक्यात आले आहे. शिक्षकांच्या अभावासोबतच शाळेची स्थितीही अत्यंत दयनीय बनली आहे. सर्वत्र राडाराड, मोडकळीस आलेली भिंती, आणि लहान-मोठ्या दुरुस्तीची कामे प्रलंबित आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांना सुरक्षित आणि सुसज्ज वातावरण मिळत नाही.

या गंभीर परिस्थितीकडे लक्ष वेधत भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष अनिल मते यांनी पुणे महानगरपालिकेकडे अधिकृत निवेदन दिले आहे. त्यांच्या सोबत व्यापारी संघटनेचे अध्यक्ष अभिषेक मते देखील उपस्थित होते.अनिल मते यांनी चेतावणी दिली की, "जर लवकरच शिक्षकांची नियुक्ती झाली नाही, तर पालकांसोबत मिळून शाळेला कुलूप ठोकण्याचा निर्णय घ्यावा लागेल!"

त्यांनी असेही नमूद केले की, "कधीपासून अर्ज आणि पाठपुरावा केला जातोय, पण अजूनही प्रशासन झोपेत आहे. विद्यार्थ्यांचे नुकसान टाळण्यासाठी तातडीने दोन नवीन शिक्षक या शाळेस देण्यात यावेत." या प्रकरणावर प्रतिक्रिया देताना वरिष्ठ अधिकारी श्री. सुरेश उचाले यांनी सांगितले की, "खडकवासला मनपा शाळेच्या संदर्भात लवकरच माहिती घेऊन निर्णय घेतला जाईल. लवकरच या शाळेला शिक्षक देण्यासंबंधी कार्यवाही करण्यात येईल."

मुख्याध्यापक अमोल माने यांनीदेखील शिक्षकांच्या कमतरतेमुळे कामावर परिणाम होत असल्याचे मान्य केले. त्यांनी सांगितले की, "दोन वर्गांमध्ये शिकवतानाच प्रशासकीय कामांमध्येही वेळ देणे कठीण जात आहे. नवीन शिक्षकांची तातडीने आवश्यकता आहे."

शिक्षण हे मुलांचे हक्काचे साधन आहे. पण शिक्षणाच्या मंदिरातच गुरुजी नसतील, तर भवितव्याची दिवाळी होताना उशीर लागणार नाही. प्रशासनाने तातडीने निर्णय घेऊन विद्यार्थ्यांच्या शिक्षणात अडथळा येणार नाही, याची खबरदारी घ्यावी – अशी पालक, शिक्षक आणि समाजातून जोरदार मागणी केली जात आहे.

'केएसएच इन्फ्रा'ची तामिळनाडूतील श्रीपेरंबुदूर बेल्टमधील दुसऱ्या प्रकल्पात

## ५५० कोटी रुपये गुंतवणुकीची केली घोषणा



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

शाश्वत अ श्रेणीतील औद्योगिक आणि लॉजिस्टिक्स पायाभूत सुविधांच्या भारतातील आघाडीच्या विकास करणाऱ्यांपैकी एक असलेल्या 'केएसएच इन्फ्रा'ने तामिळनाडूमधील त्यांच्या दुसऱ्या प्रकल्पात ५५० कोटी रुपयांच्या नियोजित गुंतवणुकीची घोषणा केली आहे.

श्रीपेरंबुदूर-ओरागाडम या उच्च विकास क्षेत्रात धोरणात्मकदृष्ट्या स्थित असलेले हे पार्क सुमारे ६० एकर पूर्ण मालकीच्या जमिनीवर पसरलेले असेल, जे १.६ दशलक्ष चौरस फूट विकासाची क्षमता ठेवते. इतर जिल्हा रस्त्यांवर सुमारे ६०० मीटर थेट समोरील बाजूने वसलेल्या या प्रकल्पात मजबूत बहुविधप्रकारे प्रवेशाचा लाभ मिळतो. जवळपास पूर्ण झालेल्या चेन्नई-बेंगळुरू एक्सप्रेस वे (एनइ-७) च्या जवळ असल्याने, प्रमुख औद्योगिक केंद्रे, बंदरे आणि उपभोग केंद्रांशी जलद जोडणीचा मार्ग मोकळा होतो, शिवाय त्यामुळे उत्पादन आणि संबंधित उद्योग सक्षमही बनते. श्रीपेरंबुदूर-ओरागाडम कॉरिडॉरमध्ये यापूर्वीच ह्युंदाई, डॅनफॉस, फ्लोसर्व्ह, एस्सार स्टील, अपोलो टायर्स, सीएट, मिशेलिन, जेके टायर, ब्रिजस्टोन, एमआरएफ, फॉक्सकॉन, फ्लेक्सट्रॉनिक्स, डेल, सॅमसंग, नोकिया, सालकॉम्प, जबिल यांसारख्या उद्योगातील दिग्गज कंपन्यांचे अस्तित्व आहे. हे स्थान वेगाने बहु-क्षेत्रीय औद्योगिक समूह विकास योजनेंतर्गत (क्लस्टर) विकसित होत आहे.

## प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांचे पुणे शहर भाजप तर्फे जंगी स्वागत

### ॲड. प्रसन्नदादा जगताप मित्र परिवारातर्फे चव्हाण यांचा सत्कार





**पुणे -लक्ष्मण साबळे (दै. आरंभ पर्व)**

प्रदेश भाजपमध्ये नुकतेच संघटनात्मक फेरबदल करण्यात आले आहेत. त्यामध्ये प्रदेशाध्यक्ष पदाची धुरा आमदार रवींद्र चव्हाण यांच्यावर सोपवली आहे. प्रदेशअध्यक्षपदी निवड झाल्यानंतर प्रथमच पुण्यनगरीमध्ये रवींद्र चव्हाण यांचे आगमन झाले. त्यावेळी पुणे शहर भाजप तर्फे त्यांचा जंगी स्वागत करण्यात आले. शहर कार्यालयामध्ये त्यांचा जंगी सत्कार करण्यात आला.

यावेळी ॲड. प्रसन्नदादा जगताप मित्रपरिवार यांच्या वतीने त्यांचे स्वागत व सत्कार करण्यात आला. यावेळी पुणे शहर भाजप अध्यक्ष धीरज घाटे, माजी उपमहापौर ॲड.प्रसन्नदादा जगताप, यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी माजी नगरसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना त्यांनी आगामी काळामध्ये भाजपाच्या कार्यकर्त्यांना निश्चितपणे न्याय देण्याचा प्रयत्न करणार असल्याचे सांगितले. व आगामी महानगरपालिका निवडणुकीच्या दृष्टीने तयारी करण्याचे आदेश यावेळी सर्व पदाधिकारी नेते कार्यकर्ते यांना चव्हाण यांनी दिले.

आगामी काळात देशाचे कर्तव्यदक्ष पंतप्रधान नरेंद्रजी मोदी, पक्षाचे अध्यक्ष जे पी नड्डा, केंद्रीय मंत्री अमितभाई शहा यांच्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्येही "शतप्रतिशत भाजपा" आमचा संकल्प असणार आहे असे आ . रवींद्र चव्हाण यांनी सांगितले.

मोदी सरकार, राज्यातील महायुती सरकारने केलेल्या सर्व योजना व कामे प्रत्येक घरोघरी पोहोचवण्यासाठी आपण सर्वांनी प्रयत्न करावे. असे आवाहन ही आ. रवींद्र चव्हाण यांनी यावेळी केले. ह्यावेळी शहर अध्यक्ष धीरज घाटे यांनी श्रीरामाची मुर्ती देऊन सत्कार केला. आगामी निवडणुकीत पुणे महानगरपालिकेमध्ये सर्वाधिक नगरसेवक जिंकून भाजपची सत्ता येणार असल्याचा विश्वास घाटे यांनी व्यक्त केला. ह्या भव्य दिव्य कार्यक्रमांमध्ये माजी उपमहापौर ॲड, प्रसन्नदादा जगताप यांनीही प्रदेशाध्यक्ष आ. रविंद्र चव्हाण यांचा सत्कार केला.

ह्यावेळी माजी उपमहापौर ॲड प्रसन्नदादा जगताप यांच्या कार्याचे चव्हाण यांनी यावेळी कौतुक केले. व ॲड.जगताप यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## थोडक्यात



### पुणे-सोलापूर महामार्गावर गटाराचे पाणी

**लोणी काळभोर (आरंभ पर्व) : पुणे - सोलापूर महामार्गावर सांडपाणी वाहत असुन त्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. पुणे सोलापूर महामार्गावर मांजरी फाटा ( द्राक्ष बागेशेजारी ) व शेवाळेवाडी फाटया शेजारी पीएमपीएल बस स्थानका समोर गटाराचे सांडपाणी वाहत असल्याने वाहनचालकांसह पादचाऱ्यांचे मोठे हाल होत आहेत. सार्वजनिक आरोग्य आणि वाहतूक सुरक्षेच्या दृष्टीने गंभीर प्रश्न निर्माण झाला असून, प्रशासन मात्र याकडे डोळेझाक करत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. गेल्या काही आठवड्यांपासून पुणे - सोलापूर राष्ट्रीय महामार्गावरून सतत गटाराचे पाणी रस्त्यावर येत असून त्यामुळे महामार्गाच्या कडेला आणि काही ठिकाणी मुख्य मार्गावरही दुर्गंधी पसरली आहे. वाहनचालक घसरड्या रस्त्यांमुळे अपघातांचा धोका वाढला आहे. दुचाकीस्वार घसरून जखमी झाल्याचे अनेक प्रकार समोर आले आहेत.किती वेळा तक्रार केली तरी पुणे महानगरपालिका कोणतीही कारवाई करत नाही. या पाण्याच्या दुर्गंधीमुळे महामार्गावरुन जाताना अवघड झाले असुन अनेक नागरिकांना या दुर्गंधीच्या पाण्यामुळे आजारी पडले आहेत. तरी लवकरात लवकर या पाण्याचा बंदोबस्त महानगरपालिकेने करावा असे सामाजिक कार्यकर्ते सागर घाडगे यांनी सांगितले. याबाबत महानगरपालिकेला वारंवार कळवले गेले असले तरी आजवर कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. साफसफाईसाठी ना कामगार पाठवले गेले, ना निचऱ्याची यंत्रणा दुरुस्त करण्यात आली. नागरिकांनी मागणी केली आहे की, गटारांची तात्काळ सफाई करावी निचऱ्याची यंत्रणा नीट कार्यान्वित करावी आणि महामार्गाच्या कडेला सांडपाण्याचा प्रवाह रोखण्यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना करावी असे शेवाळेवाडी ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच अमोल जगताप यांनी सांगितले.**

### महत्त्वाकांक्षी लक्ष्यासह सिग्नेचर ग्लोबलची आगेकूच

**पुणे (आरंभ पर्व) : जूनमध्ये संपलेल्या तिमाहीत बुकिंगमध्ये १५% घट झाली असली तरी, रिअल इस्टेट क्षेत्रातील आघाडीची कंपनी सिग्नेचरग्लोबल या आर्थिक वर्षात ₹१२,५०० कोटी रुपयांची घरे विकण्याचे आपले उद्दिष्ट गाठणारच, असा विश्वास कंपनीचे अध्यक्ष प्रदीपकुमार अग्रवाल यांनी व्यक्त केला आहे. सिग्नेचरग्लोबल आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये विक्री बुकिंगच्या बाबतीत पाचवी सर्वात मोठी सूचीबद्ध रिअल इस्टेट फर्म म्हणून उदयास आली आहे, जिने ₹१०,२९० कोटी रुपयांच्या विक्रमी प्री-सेल्सची नोंद केली. गुरुग्राममध्ये मुख्यालय असलेल्या या कंपनीने चालू आर्थिक वर्षात ₹१२,५०० कोटी रुपयांचे प्री-सेल्स किंवा सेल्स बुकिंग करण्याचे महत्त्वाकांक्षी लक्ष्य ठेवले आहे. कंपनीच्या भविष्यातील योजनांवर प्रकाश टाकताना, सिग्नेचरग्लोबलचे अध्यक्ष प्रदीप कुमार अग्रवाल म्हणाले, "चालू आर्थिक वर्षात ₹१२,५०० कोटी रुपयांच्या विक्री बुकिंगचे उद्दिष्ट साध्य करण्याचा आम्हाला पूर्ण विश्वास आहे." त्यांनी पुढे सांगितले की, या आर्थिक वर्षाच्या उर्वरित कालावधीत गुरुग्राममध्ये नवीन प्रकल्प लॉंच करण्याची कंपनीची दमदार योजना आहे. प्रकल्पांचे वेळेवर बांधकाम पूर्ण करण्याचा चांगला इतिहास असलेल्या कंपन्यांसाठी घरांची मागणी अजूनही मजबूत आहे, असे अग्रवाल यांनी आवर्जून नमूद केले.**

# वारजे, खडकवासला, कात्रजमधील गोवंशाला लंपी सदृश रोगाची लागण; वेळीच उपाययोजना करण्याची गरज



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

वारजे माळवाडी मध्ये गोवंशाला लंपी सदृश रोगाची लागण झाली असल्याचे समोर आले आहे. या पार्श्वभूमीवर वृत्त प्रसिद्ध केल्यानंतर आता खडकवासला आणि कात्रज भागातील गोवंश देखील लंपी सदृश रोगाच्या विळख्यात असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे शहराच्या उपनगरांमध्ये लंपीने आपला विळखा घालायला सुरुवात केली आहे की काय असे भितीदायक चित्र समोर आले आहे. त्यामुळे प्रशासनाने वेळीच पावले उचलण्याची गरज असून, हा रोग जर वाढत गेला तर शहरात एका मोठ्या साथीच्या रोगाचे आगमन होऊन प्राणीजीवन विस्कळीत होऊ शकते. यामध्ये कात्रज मधील दत्तनगर, जांभूळवाडी भागात असलेल्या एका गोशाळेतील गोवंशाला लंपी सदृश रोगाची बाधा झाली असल्याचे चेकमेट टाईम्सच्या नियमित दर्शकाने कळवले आहे. तर खडकवासला गावातील गोवंश देखील लंपी सदृश रोगाच्या विळख्यात असल्याचे तेथील दर्शकाने कळवले आहे. तर महानगरपालिकेकडून ठोस उपाययोजना आणि औषधोपचाराची गरज असल्याचे देखील त्यांनी स्पष्ट केले आहे. यावर आता शासन किती वेगवान हालचाली करते हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

गुगल वरून मिळालेल्या माहितीनुसार; लंपी (Lumpy Skin Disease) हा एक विषाणूजन्य रोग आहे, जो गुरे आणि म्हशींमध्ये होतो. यात जनावरांच्या त्वचेवर गाठी येतात, ताप येतो आणि ते लंगडतात. हा रोग प्रामुख्याने डास, माश्या आणि गोचिड यांच्याद्वारे पसरतो.

लंपी स्कीन आजाराची माहिती आणि कारण: हा रोग Lumpy Skin Disease Virus (LSDV) (LSDV) नावाच्या विषाणूमुळे होतो, जो पॉक्सव्हायरस कुटुंबातील आहे.

पसरण्याची पद्धत: रोगग्रस्त जनावरांच्या संपर्कात आल्यास, तसेच डास, माश्या आणि गोचिड यांच्या चावण्यामुळे याचा प्रसार होतो. (ज्या भागात हि जनावरे आढळली आहेत, त्या भागात पुणे महानगरपालिकेची स्वच्छता यंत्रणा काम करत नाही. सर्वत्र चिखलाचे साम्राज्य आहे. बीडीपी आरक्षण बाधित क्षेत्र असल्याने पुणे महानगरपालिकेचा कर भरून देखील रस्ते, पाणी, ड्रेनेज अशा कोणत्याच सुविधा नाहीत. माणुसकीतून कचरा उचलण्यापलीकडे कचरा उचलण्याची देखील ठोस यंत्रणा नाही.)

लक्षणे: जनावरांना ३ ते ५ दिवस ताप येतो. त्वचेवर गाठी येतात, ज्या दोन ते पाच सेंटीमीटर पर्यंत वाढू शकतात. गाठींमुळे जनावरे लंगडतात. डोळे आणि नाकातून स्त्राव येतो. तोंडाला फोड येतात.

उपाय: लसीकरण हा यावरचा प्रभावी उपाय आहे, असे पशुवैद्यकीय तज्ञ सांगतात. लक्षणे दिसल्यास त्वरित पशुवैद्यकाशी संपर्क साधावा. जनावरांना स्वच्छ ठिकाणी ठेवावे. डास, माश्या आणि गोचिड यांच्यापासून बचाव करण्यासाठी उपाययोजना कराव्यात.

# थोडक्यात



## किलबिल इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये गुरु पौर्णिमा उत्साहात संपन्न

पुणे (आरंभ पर्व) : अनुलोम संस्थेच्या खडकवासला भाग यांच्यावतीने गुरु पौर्णिमेच्या निमित्त किलबिल इंग्लिश मीडियम स्कूल रायकर मळा धायरी येथे विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. ह्यामध्ये प्रश्नमंजुषा स्पर्धा घेण्यात आली. ह्या प्रश्नमंजुषा स्पर्धेत 85 विद्यार्थी व विद्यार्थिनी सहभागी झाले. याशिवाय गुरुपौर्णिमेनिमित्त गुरुगौरव हा कार्यक्रमही घेण्यात आला .या कार्यक्रमाला प्रिन्सिपल सुरया शेख यांच्यासह आठवी नववी दहावी सर्व विद्यार्थी शिक्षक शिक्षिका तसेच कर्मचारी उपस्थित होत्या. कार्यक्रमाची प्रास्ताविका माधवी पाटील यांनी केली. तसेच अनुलोम या विषयाची सर्व माहिती भाग जनसेविका सौ.नयन चव्हाण यांनी दिली. गुरूचे महत्त्व या विषयाची मांडणी माधवराव गावडे अनुलोम मित्र व रोहिणी राहणे पुणे शहर उपाध्यक्ष भाजपा यांनी दिली. अनुलोम मैत्रीण छाया भगत,राजश्रीताई घोरपडे या उपस्थित होत्या. विद्यार्थ्यांच्या हस्ते शिक्षकांचा सन्मान करण्यात आला. प्रिन्सिपल सुरय्या शेख यांनी कार्यक्रमाचा समारोप केला.



## वन क्षेत्रातून वाड्या वस्त्यांवर जाणाऱ्या रस्त्यांच्या दुरुस्ती साठी चर्चा

लोणी काळभोर (आरंभ पर्व) : लोणी काळभोर येथील वनक्षेत्रातून अनेक वाड्यावर त्यांवर जाणाऱ्या रस्त्याच्या दुरुस्तीसाठी व डांबरीकरणासाठी सकारात्मक चर्चा झाली . पुणे जिल्हा उपवनसंरक्षक, पुणे विभाग, पुणे महादेव मोहिते व वनपरिक्षेत्र अधिकारी सुरेश वरक यांनी तीर्थक्षेत्र रामदारा या ठिकाणी भेट दिली . यावेळी रामदारा परिसराचे सुशोभीकरण करण्याबाबत त्यांच्याशी सविस्तर चर्चा झाली. विशेष करून रामदरा येथील तळ्यामध्ये विविध प्रकारचे कारंजे व त्यास विविध प्रकारच्या लाईट्स करण्याबाबतचे आदेश त्यांनी त्वरित त्यांच्या विभागाला दिले. त्याचबरोबर तळ्याच्या कडेने बसून सदर कारंज्याचा व सुशोभीकरणाचा नागरिकांना आनंद घेता यावा यासाठी बैठक पद्धत, सेल्फी पॉईंट बनवण्याबाबत निर्णय झाला. लोणी काळभोर गावाला खूप मोठे वनक्षेत्र आहे व त्या ठिकाणी भविष्यात वन उद्यान किंवा इतर महत्त्वाकांक्षी प्रोजेक्ट होऊ शकतात असेही मोहिते यांनी यावेळी सांगितले. लोणी काळभोर मधील वन क्षेत्रातून गावातील अनेक महत्त्वाचे वाड्या वस्त्यांना जोडणारे प्रमुख रस्ते जातात. त्या रस्त्यांची दुरुस्ती व्हावी व डांबरीकरणास परवानगी मिळावी याबाबत ही सकारात्मक चर्चा झाली. त्याचबरोबर लोणी काळभोर वन व्यवस्थापन समिती व ग्रीन फाउंडेशन या सेवाभावी संस्थेमार्फत गेल्या अनेक वर्षांपासून वृक्षारोपणाचा कार्यक्रम हाती घेतला जातो .परंतु हाता-तोंडाशी आलेली झाडं प्राणी खाऊन टाकतात त्यामुळे हवे तसे वनीकरण होत नाही. या झाडांना संरक्षण जाळी पुरवण्यात यावी अशी मागणी केली. यावेळी लोणी काळभोरचे सरपंच राहुल काळभोर ,वन परिमंडळ अधिकारी प्रमोद रासकर , लोणी काळभोर वनरक्षक अंकुश कचरे ,वन व्यवस्थापन समिती अध्यक्ष युवराज काळभोर ,माजी उपसरपंच राजेंद्र काळभोर ,माजी ग्रामपंचायत सदस्य पांडुरंग केसकर ,राष्ट्रवादी किसान सेलचे उपाध्यक्ष रमेश काळभोर सामाजिक कार्यकर्ते हिरामण केसकर आदी उपस्थित होते.

### दारू कंपन्यांना परवाने देण्याचा निर्णय म्हणजे लाडक्या बहिणींचे संसार उद्ध्वस्त करण्याचे पाऊल

# तृप्ती देसाई यांचा सरकारवर घणाघात

- उज्वल निकम यांनी सरकारी वकील पद सोडावे – तृप्ती देसाई यांची प्रतिक्रिया
- "राज्यसभेचा खासदार आणि सरकारी वकील एकाच वेळी?"



**पुणे-प्रतिक गंगणे (दै. आरंभ पर्व)**

महाराष्ट्र सरकारच्या 'लाडकी बहिण योजना'चे स्वागत करताना देखील भूमाता ब्रिगेडच्या संस्थापक तृप्ती देसाई यांनी सरकारवर जोरदार टीका केली आहे. "लाडक्या बहिणींसाठी योजना राबवायच्या आणि त्या राबविण्यासाठी दारू कंपन्यांना परवाने द्यायचे ही दुहेरी नीती महिलांच्या संसारासाठी घातक आहे," असे तीव्र शब्दांत देसाईंनी सरकारच्या निर्णयाचा निषेध केला.

राज्य सरकारने पावसाळी अधिवेशनात १२८ नव्या दारू परवान्यांना मंजुरी देण्याची घोषणा केली. १९७२ नंतर पहिल्यांदाच एवढ्या मोठ्या प्रमाणात दारू कंपन्यांना परवाने देण्यात आले आहेत. सरकारचे म्हणणे आहे की लाडकी बहिण योजना राबवण्यासाठी निधी कमी पडत असल्याने अतिरिक्त महसुलासाठी हा निर्णय घेण्यात आला.

तृप्ती देसाई म्हणाल्या, "सरकारने महिलांचा विचार करावा म्हणून 'लाडकी बहिण' योजना आणली. पण त्याच महिलांचा संसार उद्ध्वस्त करणाऱ्या दारू कंपन्यांना परवाने देऊन सरकारने त्यांच्या कुटुंबांवर विषप्रयोग केला आहे. घर चालविण्यासाठी मदत हवी, आणि घर उध्वस्त करणारे व्यसन वाढवायचं – हे फारच विरोधाभासी पाऊल आहे."

त्यांनी पुढे म्हटले, "महिलांच्या मदतीसाठी योजना सुरू करत असताना पुरुष वर्गात व्यसनाधीनता वाढवणाऱ्या निर्णयांचा काय उपयोग? सरकार या गोष्टीतून महसूल कमावेल, पण महिलांचे संसार आणि आयुष्य उद्ध्वस्त होतील."

देसाईंनी सरकारकडे स्पष्ट मागणी केली की, "दारू कंपन्यांना देण्यात आलेले परवाने त्वरित रद्द करावेत. अन्यथा याविरोधात राज्यभर तीव्र आंदोलन उभारले जाईल."

तृप्ती देसाई यांनी दुसऱ्या एका मुद्द्यावरही सरकारवर कडक टीका केली आहे. नुकतेच राष्ट्रपती कोट्यातून उज्वल निकम यांची राज्यसभेत नियुक्ती करण्यात आली आहे. मात्र, संतोष देशमुख हत्या प्रकरणात निकम हे विशेष सरकारी वकील म्हणून कार्यरत आहेत. या प्रकरणात आरोपी धनंजय मुंडे यांचे निकटवर्तीय वाल्मिक कराड अडकले असल्याचे सांगितले जाते.

देसाई म्हणाल्या, "सरकारकडून किंवा राष्ट्रपतींच्या शिफारशीवरून जर कोणी राज्यसभेचा सदस्य झाला असेल, तर त्याने कोणत्याही संवेदनशील खटल्यात सरकारी वकील म्हणून भूमिका घेणे म्हणजे न्यायव्यवस्थेच्या नजरेत शंका निर्माण करणे आहे."

त्यांनी स्पष्टपणे सुचवले की, "जर उज्वल निकम यांनी निःपक्षपातीपणा राखायचा असेल, तर त्यांनी संतोष देशमुख हत्या प्रकरणातून स्वतःहून बाजूला व्हावे."

संतोष देशमुख यांची क्रूर हत्या झाल्यानंतर महाराष्ट्रात संतापाची लाट उसळली होती. अशा गंभीर प्रकरणात संबंधित आरोपी हे सत्ताधाऱ्यांच्या जवळचे असल्याने, जनतेत शंका निर्माण होणे स्वाभाविक आहे. याच पार्श्वभूमीवर देसाईंनी उज्वल निकम यांच्या भूमिकेबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.

### सरकारचा निर्णय महिलाविरोधी – देसाई यांचा रोष

**तृप्ती देसाई यांच्या मते, महिलांसाठी योजना सुरू करताना त्यांना दुय्यम वागणूक देणे, व्यसनाला उत्तेजन देणे, आणि राजकीय नियुक्ती करून न्यायप्रक्रियेत हस्तक्षेप करणे – हे सारे महिलांविरोधी कारभाराचे निदर्शक आहे. त्यांनी शेवटी म्हटले, "महिला सन्मान, सुरक्षितता आणि स्वावलंबन हे सरकारच्या धोरणाच्या केंद्रस्थानी असायला हवेत. दारूपरवाने देणे आणि पक्षीय वकिलांची नियुक्ती यामुळे महिला सक्षमीकरण होत नाही, तर महिलांच्या संघर्षाला आणखी वळण लागते."**

# डॉ. व्यंकटेश वांगवाड यांचे खेळासाठीचे योगदान मोठे

- सनसिटी रोड ज्येष्ठ नागरिकांतर्फे अभिष्टचिंतन सोहळ्याचे आयोजन



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

टेनिस हॉलीबॉल चे जनक डॉ व्यंकटेश वांगवाड यांच्या 77 व्या वाढदिवसानिमित्त सनसिटी रोड ज्येष्ठ नागरिक संघ सिंहगड रोड यांच्या वतीने अभिष्टचिंतन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. टेनिस हॉलीबॉलचा २७ वा वर्धापन दिन साजरा करण्यात आला. डॉ. व्यंकटेश वांगवाड स्वतः ज्येष्ठ नागरिक संघाचे सभासद असून त्यांचे टेनिस हॉलीबॉल खेळास दिलेल संपूर्ण आयुष्य, खेळाबद्दलचा प्रवास मांडण्यात आला.

यावेळी माजी उपमहापौर ॲड प्रसन्नदादा जगताप प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. डॉ. वांगवाड यांच्या कार्याचा त्यांनी गौरव केला तसेच भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या. ज्येष्ठ नागरिकांसाठी एक मोठे सभागृह असावे या मागणीला जगताप यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. उपस्थित नागरिकांनी देखील डॉ .वांगवाड यांच्या कार्याचे कौतुक केले.

यावेळी खेळाडूंचा सत्कार करण्यात आला. संघाचे अध्यक्ष सुरेश कट्टे, सचिव साळुंके, नाईक, डॉ. अजित फरांदे, प्रो. मिलिंद कांबळे, बनसोडे, निवृत्त पोलिस निरीक्षक कुलकर्णी, श्रीराम वेळापूरे, अभिजीत लोहे, पडळकर, पोलिसे निरीक्षक शेवाळे, ज्ञानपीठ करिअर अकॅडमी चे संग्राम खाडे, संदीप भोसले, प्राची तसेच ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते.

यावेळी बोलताना डॉ. वांगवाड यांनी ज्येष्ठ नागरिक संघाचे आभार मानले. आगामी काळातही क्रीडा क्षेत्रासाठी झटणार असल्याचे सांगितले. यावेळी प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत डॉ. व्यंकटेश वांगवाड यांचा वाढदिवस केक कापून साजरा करण्यात आला.

## दादांच्या वाढदिवसा निमित्त कार्यक्रम

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्या वाढदिवसानिमित्त शिवराज्य समूह पुणे यांच्या वतीने नऱ्हे येथे विविध शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये आधार कार्ड नोंदणी व दुरुस्ती, मोतीबिंदू ऑपरेशन, इंडियन ओव्हरसीज बँक अकाउंट ओपनिंग, आरटीओ संबंधित कामे यांच्या विविध शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. याशिवाय मोफत मतदान ओळखपत्र मिळणार आहे. येत्या रविवारी दि.20 जुलै रोजी सकाळी 9 ते सायं 6 वाजेपर्यंत भूपेंद्र मोरे मध्यवर्ती जनसंपर्क कार्यालय कृष्णाई नगर, नऱ्हे येथे हे शिबिर होणार आहे.

## ग्रामपंचायत कुसगाव, ता. भोर जि. पुणे

### जाहीर खुली बि - १ निविदा नोटीस

ग्रा.पं.कुसगाव, ता.भोर, जि.पुणे यांचेकडून या जाहीर निविदा नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, ग्रा.पं.कुसगाव येथे खालील प्रमाणे काम मंजुर असून सदर कामासाठी निविदा दि. १८/०७/२०२५ ते दि. २४/०७/२०२५ पर्यंत सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत ग्रा.पं.कडे दाखल कराव्यात.

| अ. क्र. | कामाचे नाव | मंजूर योजना नाव | अं.प. रक्कम | निविदा रक्कम (जि.एस.टी.सहीत) | बयाणा रक्कम | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | कुसगाव वेताळनगर येथे बंदिस्त गटर बांधणे. | २०% समाज कल्याण सेस | ५.०० लक्ष | ५९०/- | ५०००/- | ६ महिने |

**अटी व शर्ती**

१) निविदा फॉर्म व कामाच्या तसेच साहीत्य बाबतच्या अटी व शर्तीची माहिती ग्रा.पं. कुसगाव कार्यालयात कार्यालयीन वेळेत मिळतील.
२) निविदा उघडण्याची प्रक्रिया दि. २५/०७/२०२५ रोजी सायंकाळी ०५.०० वाजता ग्रा.पं.कुसगाव येथे पार पडेल.
३) निविदेसोबत नोंदणी प्रमाणपत्र, पॅनकार्ड, जि.एस.टी.प्रमाणपत्र झेरॉक्स, व निविदा तसेच बयाणा रकमेचा डी.डी / धनादेश सरपंच, ग्रा.पं.कुसगाव यांचे नावाने देय असावा त्याचप्रमाणे इतर आवश्यक कागदपत्रे स्वयं - साक्षांकित करून जोडावेत.
४) सर्व कामांच्या शासकीय नियमानुसार सर्व कपाती केल्या जातील.
५) कामाचे देयक काम पूर्ण झालेनंतर मोजमाप पुस्तिकेत नोंद होऊन काम पूर्णत्वाचा दाखला मिळाल्यानंतर देण्यात येईल.
६) कामावर तांत्रिक मार्गदर्शन उपअभियंता जि.प.उपविभाग भोर यांचे राहिल.
७) साहित्याचा दर्जा तपासून पुढील देयक अदा केले जाईल.
८) निविदा स्वीकारणे अथवा नाकारण्याचा संपूर्ण अधिकार ग्रा.पं.कुसगाव यांनी राखून ठेवला आहे.

स्वाक्षरी /-
ग्रामपंचायत अधिकारी सरपंच
ग्रामपंचायत कुसगाव, ता. भोर जि. पुणे

## ग्रामपंचायत वांगणीवाडी, ता. वेल्हे जि. पुणे

### जाहीर खुली बि - १ निविदा नोटीस

ग्रा.पं.वांगणीवाडी, ता. वेल्हे, जि.पुणे यांचेकडून या जाहीर निविदा नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, ग्रा.पं.वांगणीवाडी येथे अनु. जाती व नवबौद्ध घटकांच्या वस्तीचा विकास करणे (दवसु) अंतर्गत खालील प्रमाणे काम मंजुर असून सदर कामासाठी निविदा दि.१८/०७/२०२५ ते दि. २४/०७/२०२५ पर्यंत सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत ग्रा.पं.कडे दाखल कराव्यात.

| अ. क्र. | कामाचे नाव | अं.प. रक्कम | निविदा रक्कम (जि.एस.टी.सहीत) | बयाणा रक्कम | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|
| १ | वांगणीवाडी बोबडेवस्ती येते बंदिस्त गटर करणे. | ५.०० लक्ष | ५९०/- | ५०००/- | ६ महिने |

**अटी व शर्ती**

१) निविदा फॉर्म व कामाच्या तसेच साहीत्य बाबतच्या अटी व शर्तीची माहिती ग्रा.पं. वांगणीवाडी कार्यालयात कार्यालयीन वेळेत मिळतील.
२) निविदा उघडण्याची प्रक्रिया दि. २५ /०७/२०२५ रोजी सायंकाळी ०५.०० वाजता ग्रा.पं.वांगणीवाडी येथे पार पडेल.
३) निविदेसोबत नोंदणी प्रमाणपत्र, पॅनकार्ड, जि.एस.टी.प्रमाणपत्र झेरॉक्स, व निविदा तसेच बयाणा रकमेचा धनादेश / डी.डी, सरपंच, ग्रा.पं.वांगणीवाडी यांचे नावाने देय असावा त्याचप्रमाणे इतर आवश्यक कागदपत्रे स्वयं - साक्षांकित करून जोडावेत.
४) सर्व कामांच्या शासकीय नियमानुसार सर्व कपाती केल्या जातील.
५) कामाचे देयक काम पूर्ण झालेनंतर मोजमाप पुस्तिकेत नोंद होऊन काम पूर्णत्वाचा दाखला मिळाल्यानंतर देण्यात येईल.
६) कामावर तांत्रिक मार्गदर्शन उपअभियंता जि.प.उपविभाग वेल्हे यांचे राहिल.
७) साहीत्याचा दर्जा तपासून पुढील देयक अदा केले जाईल.
८) निविदा स्वीकारणे अथवा नाकारण्याचा संपूर्ण अधिकार ग्रा.पं.वांगणीवाडी यांनी राखून ठेवला आहे.
९) सदर कामाचे ९०% देयक जमा असल्याने काम पुर्ण झाल्यानंतर उर्वरीत १०% रक्कम प्रस्तावाअंती नियमानुसार जमा झाल्यानंतरच अदा केली येईल. याची सर्वांनी नोंद घ्यावी.

स्वाक्षरी /-
ग्रामपंचायत अधिकारी सरपंच
ग्रामपंचायत वांगणीवाडी, ता. वेल्हे जि. पुणे

# दोडके यांच्या प्रयत्नातून उजळले गोकुळनगर

### पुणे महानगरपालिकेच्या माध्यमातून गोकुळनगर पठार येथे पथदिव्यांचे लोकार्पण



**वारजे (दै. आरंभ पर्व)**

वारजे माळवाडी परिसरातील गोकुळनगर पठार येथे अनेक वर्षापासून अंधारमय परिसरात नागरिकांना वास्तव्य करावे लागत होते. या भागातील रस्त्यावर पथदिवे नव्हते.

ही बाब लक्षात घेत स्थानिक नागरिकांनी माजी नगरसेवक सचिन दोडके यांच्याकडे ह्या कामासाठी आग्रह धरला .

कार्यक्षम नेतृत्व म्हणून ओळख असलेले माजी नगरसेवक सचिनभाऊ दोडके यांनी सातत्याने पुणे महानगरपालिका कडे या कामासाठी पाठपुरावा केला होता. अखेर त्या कामाला यश आले होते.त्यावेळी दोन टप्प्यात पथदिवे लावण्यात आले .

पुणे महानगर पालिकेच्या माध्यमातून तिसऱ्या टप्प्यात लावण्यात आलेले ४० पथदिवे नुकतेच सुरू करण्यात आले. यावेळी स्थानिक नागरिकांच्या माध्यमातून या दिव्यांचे पूजन करण्यात आले.

या पथदिव्याच्या शुभारंभ प्रसंगी माजी नगरसेवक सचिन दोडके यांच्यासह परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. खऱ्या अर्थानं गोकुळ नगर पठार परिसरात प्रकाश दरवळला असल्याची भावना उपस्थित नागरिकांनी बोलून दाखवली.

ह्या नागरिकांची अनेक दिवसापासूनची इच्छा पूर्ण झाली. ह्या गोकुळनगर पठार परिसरातील नागरीकांना दोडके यांनी हा परिसर प्रकाशमय करण्याचा शब्द दिला होता. तो अखेर यानिमित्त पूर्ण झाला आहे याची प्रचिती यानिमित्त दिसून आली. स्थानिक नागरिकांनी अत्यंत उत्स्फूर्तपणे दोडके यांच्या कामाबद्दल कौतुक व्यक्त केले.

**माझ्या पाठीशी असलेल्या सर्व लोकांना मी दिलेला शब्द पूर्ण करू शकलो याचं मला देखील समाधान वाटतंय. आगामी काळात देखील नागरिकांच्या विकासासाठी मी कटिबध्द असून, पुढील काळात देखील आपल्या परिसरात विकासपर्व राबवायचे आहे. अशी प्रतिक्रिया सचिन दोडके यांनी यानिमित्त व्यक्त केली.**



# India Earth 2025 – Season 6 : एरंडवणेमधील भव्य फॅशन शोचा जल्लोष

## नवोदितांना आत्मविश्वासाचा नवा चेहरा



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुण्यातील एरंडवणे येथील रिलायन्स मॉलमध्ये India Earth 2025 – Season 6 हा भव्य फॅशन शो अत्यंत यशस्वीरीत्या पार पडला. सौंदर्य, आत्मविश्वास, सृजनशीलता आणि व्यावसायिकतेचा उत्कृष्ट संगम म्हणजेच हा फॅशन शो ठरला. सुयश प्रोडक्शनच्या वतीने आयोजित करण्यात आलेला हा कार्यक्रम नवोदितांसाठी एक सुवर्णसंधी ठरली, तर प्रेक्षकांसाठी एक अद्वितीय अनुभव.

**दिग्दर्शन व सादरीकरण :** कार्यक्रमाचे दिग्दर्शन उद्धव खरड यांनी कौशल्यपूर्णपणे केले, तर साहिल डी यांनी सहायक दिग्दर्शक म्हणून महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडली. शोची कोरिओग्राफी व स्पर्धकांचे ग्रूमिंग सुप्रसिद्ध कोरिओग्राफर अल्पा शाह यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडले. त्यांच्या अनुभवातून प्रत्येक स्पर्धकात आत्मविश्वास निर्माण झाला.

**ग्लॅमर टीमची झलक :** फॅशन क्षेत्रात लुक आणि स्टाईलला अनन्यसाधारण महत्त्व असते. यासाठी मेकअप आणि हेअर स्टाइल विभागाचे योगदान अत्यंत उल्लेखनीय ठरले. या विभागात रेवती चंद्रकांत एदासकर, श्रुतिका ऋषिकेश लांडगे, सानिया सय्यद, निकिता गायकवाड आणि नरेंद्र भदाणे यांनी आपल्या कौशल्याने स्पर्धकांचे सौंदर्य खुलवले. फोटोग्राफर लोकेश वागदरे, अमित पारेख आणि बजरंग मासाळ यांनी प्रत्येक क्षण कॅमेऱ्यात कैद करत शोचे स्मरणीय दस्तऐवजीकरण केले.

**पारदर्शक परीक्षणासाठी परीक्षकांची उपस्थिती :** कार्यक्रमाचे परीक्षण रुतुजा जाधव, तुषार पवार आणि मेघना भालेराव या अनुभवी परीक्षकांनी केले. त्यांनी प्रत्येक स्पर्धकाच्या रॅम्प वॉक, पोझिंग, आत्मविश्वास, अभिव्यक्ती आणि सादरीकरणाचे बारकाईने परीक्षण करत निर्णय घेतले.

**सुत्रसंचालनाचा आत्मविश्वास :** कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बीना पवार यांनी एकहाती सांभाळले. त्यांच्या स्पष्ट, प्रवाही आणि प्रेक्षकांना गुंतवून ठेवणाऱ्या सादरीकरणाने संपूर्ण कार्यक्रमाला वेगळेच तेज मिळाले. प्रेक्षकांमध्ये त्यांच्या अँकरिंग कौशल्याचे विशेष कौतुक झाले.

**मान्यवरांची उपस्थिती – कार्यक्रमाचा गौरव :** कार्यक्रमात अनेक मान्यवर उपस्थित होते. त्यामध्ये API कैलास लहाने, दीपाली खैरमोडे, विजय बन्सोडे, मॉडेल अंशुला पवार, उमेश पवार, कृष्णा देशमुख, विद्या घाडगे, शर्वरी कांबळे, प्रणाली यादव, रुतुजा चिट्टे आणि सोहेल शेख यांचा समावेश होता. या मान्यवरांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाचा दर्जा अधिकच उंचावला.

India Earth 2025 – Season 6 हा शो केवळ फॅशन शो नसून आत्मविश्वास, व्यक्तिमत्त्व विकास आणि समाजापुढे एक वेगळा आदर्श सादर करणारा प्लॅटफॉर्म ठरला.

विविध वयोगटांतील स्पर्धकांनी रॅम्पवर केवळ सौंदर्यच नव्हे तर आपले स्वप्न, मेहनत आणि आत्मभान सादर केले.

या शोच्या यशामागे आयोजक, स्पर्धक, तांत्रिक कर्मचारी, कलाकार, परीक्षक आणि प्रेक्षकांचा मोठा सहभाग आहे. हा कार्यक्रम नवोदित मॉडेल्ससाठी केवळ मंच नव्हता, तर एक प्रेरणास्थान होता – स्वप्नांच्या दिशेने चालण्याचा आरंभबिंदू!

MEDIA PARTNERS
दैनिक आरंभपर्व आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

### Miss Category
- Best Attitude: पायल दिलीप गुंजाळ
- Best Photogenic: ज्ञानदा वेताळ
- Best Confidence: सृष्टी अशोक पाटील

### Mrs Category
- Best Confidence: शर्मिला जैन
- Best Attitude: माधुरी थोरात
- Best Ramp Walk: वनीता राठोड
- Best Expressions: अमृता कुलकर्णी

### Mr Category
- Best Expression: अशिष भगवानदास राठी
- Best Confidence: किरण मुलचंद वाघ
- Best Ramp Walk: कैलास नामदेव सुतार
- उत्सव सौंदर्याचा नाही तर आत्मसन्मानाचा!

### Mrs Category
- पूर्वा शुभम विभुते – प्रथम क्रमांक
- माधुरी अभिजित दीक्षित – First Runner Up
- सोनाली सागर शिंदे – Second Runner Up

### Miss Category
- डॉ. मृणाल मधुकर मापारी – विजेती
- तनिष्का कोल्हापुरकर – First Runner Up
- उज्वला यशवंत मढवी – Second Runner Up

### Mr Category
- शेख इरफान मुसा – विजेता
- शेख हुजैफ – First Runner Up
- रवी नारायण राणा – Second Runner Up

### Kids Category
- स्वरा अनंत पाथ्रुडकर – विजेती
- मायरा अभिजित दीक्षित – First Runner Up
- रेयांश पाथ्रुडकर – Second Runner Up
- विशेष सबटायटल्स विजेते



## आदिवासी विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप

- **आस्ताना ई कलंदर ट्रस्टचा उपक्रम**

**राजगुरूनगर-किरण खुडे (दै. आरंभ पर्व)**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वरची ठाकरवाडी व वाफगाव येथील वस्तीगृहातील आदिवासी, गरीब व गरजू विद्यार्थ्यांना वर्षभर पुरेल इतके शैक्षणिक साहित्य तसेच दप्तर व शाळेत विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी आधूनीक शुभ्र व हिरव्या वर्गफलकांचे वाटप करण्यात आले. गरीब, गुणवंत व गरजू विद्यार्थ्यांना शिक्षण घेत असताना शैक्षणिक सुविधा कमी पडू नयेत व या विद्यार्थ्यांच्या शिक्षणात खंड पडू नये म्हणून आस्ताना ई कलंदर ट्रस्टचे अध्यक्ष दत्तात्रय गुंजाळ तसेच ट्रस्टचे विश्वस्त सुनील मांदळे यांच्या माध्यमातून आवश्यक शैक्षणिक साहित्य शाळेसाठी मिळाले. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वरची ठाकरवाडी येथील शाळेतील विद्यार्थ्यांना तसेच वाफगाव विद्यालयाच्या वस्तीगृहात असणाऱ्या मुलांना शैक्षणिक शालेय वस्तू भेट दिल्या. यामध्ये वह्या ,चित्रकला वह्या, चित्रकला पेन्सिल, पेनसंच, पेन्सिल स्केल तसेच शालेय बॅगचे वाटप करण्यात आले. यावेळी लहानग्यांचा चेहऱ्यावरीला आनंद पाहण्यासारखा होता.

शाळेसाठी देण्यात आलेल्या साहित्यासाठी आशा नाईक तसेच पुण्याच्या सिम्बॉयसिस कॉलेजचे प्राचार्य अनुराग महाजन यांचे महत्त्वपूर्ण योगदान लाभले.

आपण समाजासाठी काही देणे लागतो, त्या ऋणातून उतराई होण्यासाठी असे प्रयत्न करत असल्याचे आपल्या मनोगतात बोलताना दत्तात्रय गुंजाळ यांनी सांगितले. आनंददायी व उत्साही शालेय वातावरण पाहून शिक्षकांचे त्यांनी कौतुक केले. शाळेचे मुख्याध्यापक वल्लभ क्षीरसागर यांनी आस्ताना ई कलंदर ट्रस्ट कोथरूड पुणे यांच्या माध्यमातून शाळेसाठी कपाट,प्रिंटर ,चटई , शालेय बॅग, वॉटर बॅग,तसेच विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी सांस्कृतिक कार्यक्रमासाठी लागणारी साऊंड सिस्टिम(ट्रॉली ऍम्प्लिफायर) अशा अनेक सुविधा शाळेसाठी उपलब्ध करून दिल्यामुळे शाळेचा भौतिक व सर्वांगीण विकास होण्यासाठी ट्रस्टचे महत्त्वपूर्ण योगदान लाभले आहे. असे सांगितले. तसेच ट्रस्टचे जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वरची ठाकरवाडी व ग्रामस्थांच्या वतीने आभार व्यक्त करण्यात आले.

वसतिगृहातील विद्यार्थ्यांना शालेय साहित्यासाठी म. य. होळकर विद्यालयाचे तत्कालीन शिक्षक सुनील घुमटकर व मेहमूद मुलाणी यांचे देखील मदत केली.

यावेळी जिल्हा परिषद सदस्य दादाभाऊ पारधी, माजी ग्रामपंचायत सदस्य सुरेश मेंगडे, कैलास सुर्वे, विजय सांडभोर तसेच कृषी अधिकारी बाळासाहेब मांदळे, शाळेचे शिक्षक रामचंद्र येवले, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष दत्तात्रय खंडागळे तसेच पालक उपस्थित होते.

रामचंद्र येवले यांनी आस्ताना ई कलंदर ट्रस्टचे आणि शाळेसाठी योगदान दिलेल्या आशा नाईक व अनुराग महाजन यांचे आभार मानले.



## चोरट्यांनी केले बारा लाखाचे दागिने लंपास

**लोणी काळभोर (दै. आरंभ पर्व)**

कदमवाकवस्ती येथील पठारे वस्ती मध्ये घरी कोणी नसल्याचा फायदा घेत चोरट्यांनी रोख रकमेसह चालू बाजारभावाप्रमाणे सुमारे बारा लाखाचे दागिने लंपास केल्याची घटना सोमवारी रात्री उघडीच आली. याबाबत लोणी काळभोर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी तपासास गती दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार शौकत शब्बीर मोगल (वय ४३वर्षे रा. तुळजाभवानी मंदिराजवळ कदमवाकवस्ती ) यांनी फिर्याद दिली असून ते काही कामानिमित्ताने त्यांच्या मुळगावी (मानेगाव ता. बार्शी जिल्हा सोलापूर ) येथे गेले होते .जाताना घरातील मौल्यवान वस्तू व दागिने लोखंडी कपाटातील लॉंकरमध्ये ठेवले होते .परत आल्यावर त्यांना घरातील दरवाजाचे कुलूप तुटलेले दिसले .घरातील सामान अस्ताव्यस्त पडलेले दिसले . कपाटाचे लॉक व लॉकर देखील तुटलेले होते. त्यामुळे आज्ञात चोराने घरात प्रवेश करुन कपाटातील लोकर मध्ये ठेवलेल्या रोख रक्कमेसह चालू बाजारभावाप्रमाणे बारा लाख रुपयांचे दागिने चोरीस गेल्याची फिर्याद मोगल यांनी दिली आहे.

## दैनिक ‘आरंभ पर्व’च्या बातमीचा परिणाम

# कोरेगावमुळ ग्रामपंचायतीने अखेर धोकादायक खांब हटवला

- **लोकशक्ती जागृत झाली की व्यवस्था हलते, याचे जिवंत उदाहरण**

**लोणी काळभोर (दै. आरंभ पर्व)**

पुणे - सोलापूर महामार्गालगत कोरेगाव मुळ गावाच्या प्रवेशद्वाराजवळ उभारण्यात आलेली स्वागत कमान मागील महिन्याभरापासून नागरिकांच्या जिवाला धोका निर्माण करत होती. २६ जून २०२५ रोजी अज्ञात वाहनाच्या धडकेत कमानीचा सिमेंट खांब मोडकळीस आला होता. परंतु ग्रामपंचायतीने याकडे दुर्लक्ष केल्याने संभाव्य दुर्घटनेचे संकट कायम होते.

"ग्रामपंचायत अपघाताची वाट पाहतेय का?" — अशा तीव्र शब्दात **दै. आरंभपर्व** मध्ये प्रसिद्ध झालेल्या बातमीनंतर अखेर ग्रामपंचायतीला जाग आली आणि संबंधित धोकादायक खांब तातडीने हटवण्यात आला.

**आरंभपर्वच्या पत्रकारितेचा ठोस परिणाम :** आरंभपर्वमध्ये प्रसिद्ध झालेल्या सविस्तर वृत्तात या कमानीच्या धोकादायक अवस्थेबाबत स्पष्ट दाखले दिले होते.



कोरेगावमुळ ग्रामपंचायत पाहते अपघाताची वाट

ग्रामपंचायत अकार्यक्षम असल्याचे घोषित केल्यास आम्ही हा खांब काढू - प्रमोद बोधे

या कमानीच्या खांबातून दररोज कोरेगाव मुळ ग्रामपंचायतीचे सरपंच लाला बोधे, ग्रामसेवक, सदस्य व स्थानिक नागरिक प्रवास करत होते. तरीही कोणतीही कारवाई न करता पदाधिकाऱ्यांनी जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्याचे नागरिकांनी सांगितले.

बातमीत स्पष्ट करण्यात आले होते की, जर तातडीने कारवाई झाली नाही, तर ग्रामपंचायत अकार्यक्षम ठरवून नागरिकांच्या पुढाकारानेच खांब हटवण्यात येईल. याला अनुसरून माजी सरपंच प्रमोद बोधे यांनी देखील आंदोलनाचा इशारा दिला होता.

**धोकादायक खांब हटवल्यामुळे नागरिकांतून समाधान :** प्रसिद्ध बातमीमुळे ग्रामपंचायतीवर दबाव निर्माण झाला आणि तात्काळ कारवाई करत ग्रामपंचायतीने खांब हटवण्याचे काम पूर्ण केले. नागरिकांनी दै. आरंभपर्वचे आभार मानत सांगितले की, “अशा निर्भीड पत्रकारितेमुळेच आमच्या समस्यांकडे प्रशासनाचे लक्ष वेधले जाते.”

**माजी सरपंच प्रमोद बोधे यांनी म्हटले,** “आरंभपर्वने आवाज उठवल्यामुळेच ग्रामपंचायतीने झोपेतून जाग येऊन खांब हटवला. हीच खरी लोकशाही आणि पत्रकारितेची ताकद आहे. आम्ही याबद्दल संपादकांचे आभार मानतो.”

या प्रकरणामुळे ग्रामपंचायतीच्या प्रशासनिक कार्यपद्धतीवर मोठे प्रश्न निर्माण झाले आहेत. नागरिकांच्या सुरक्षेची जबाबदारी घेण्याऐवजी, घटनाक्रम घडल्यावरच हालचाल करणाऱ्या यंत्रणेवर नागरिक संतप्त आहेत.

**● पुढील मागण्या काय? ●**

**प्रवेशद्वाराचे पुन्हा सुरक्षित पुनर्बांधकाम करावे**

**ग्रामपंचायत परिसरातील सर्व सार्वजनिक बांधकामांची तपासणी व्हावी**

**संबंधित अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करावी**

**आरंभपर्वच्या बातमीमुळे एक संभाव्य जीवघेणा धोका टळला. ही घटना पत्रकारितेच्या सामाजिक उत्तरदायित्वाचे उदाहरण ठरली असून, लोकशाहीत माध्यमांची भूमिका किती महत्त्वाची आहे, हे पुन्हा अधोरेखित झाले.**

## डॉ. सुचेता कुलकर्णी यांना प्रतिष्ठेचा पुरस्कार

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पीबीएमएच्या एच व्ही देसाई आय हॉस्पिटलच्या वैद्यकीय संचालिका डॉ.सुचेता कुलकर्णी यांना अहमदाबाद येथे पार पडलेल्या व्हिजन 2020 या राष्ट्रीय परिषदेत वुमन लीड फॉर आय केअर या प्रतिष्ठेच्या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. नेत्रसेवा आणि नेत्रशिक्षण क्षेत्रातील त्यांच्या दीर्घकालीन व उल्लेखनीय कामगिरीची दखल घेत हा सन्मान करण्यात आला. याप्रसंगी केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाचे सह सचिव विनय नेहरा यांच्या हस्ते हा पुरस्कार देण्यात आला. ब्लाईंड पीपल्स असोसिएशनचे उपसंचालक डॉ.धर्मेंद्र कुमार जेना,सहसचिव डॉ.भूषण पुनानी आणि व्हिजन 2020




परिषदेचे अध्यक्ष डॉ.राजेश सैनी आदी मान्यवर उपस्थित होते. व्हिजन 2020 : द राईट टू साईट इंडिया ही राष्ट्रीय परिषद ब्लाईंड पीपल्स असोसिएशन या 1954 पासून कार्यरत असलेल्या संस्थेतर्फे आयोजित केली जाते. परिषदेचे हे 19 वे सत्र होते व यामध्ये नेत्रचिकित्सेशी संदर्भात विविध वैज्ञानिक सत्रात भारतभरातून नेत्रचिकित्सक सहभागी झाले होते.

## रक्तदान शिबिर व वृक्षारोपण कार्यक्रम संपन्न

- **येळी फाटा येथे राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय प्रवक्ते आमदार धनंजय मुंडे यांचा वाढदिवस साजरा**

**हिंगोली (दै. आरंभ पर्व)**

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय प्रवक्ते तथा महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री परळी विधानसभेचे आमदार धनंजयजी मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त भव्य रक्तदान व रक्त तपासणी शिबिर तसेच वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन मंगळवारी 15 जुलै रोजी औंढा तालुक्यातील येळी फाटा येथे करण्यात आले होते या कार्यक्रमाला राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे हिंगोली जिल्हाध्यक्ष बिडीदादा बांगर उमाकांत भैया




नवघरे व राष्ट्रवादी काँग्रेसचे जिंतूर तालुकाध्यक्ष लक्ष्मणराव बुधवंत यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती यावेळी उपस्थित मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त करून कार्यक्रमात शुभेच्छा दिल्या त्यानंतर मोठ्या प्रमाणावर उत्साह पूर्वक 57 रक्तदात्यांनी रक्तदान केले तसेच वृक्षारोपण करण्यात आले अशा पद्धतीने उत्साह पूर्वक वाढदिवसाच्या कार्यक्रम दरवर्षीप्रमाणे याही वर्षी मोठ्या थाटामाटात पार पडला.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे हिंगोली जिल्हाध्यक्ष मा.बि. डी दादा बांगर, उमाकांत भैया नवघरे,राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिंतूर तालुकाध्यक्ष लक्ष्मणराव बुधवंत, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे औंढा तालुकाध्यक्ष तथा जि.प सदस्य संजय दराडे, राष्ट्रवादी ओबीसी सेल चे जिल्हाध्यक्ष विक्की देशमुख,माजी पं.स सदस्य गजानन सांगळे,भगवान इघारे,जयराम कुटे, पांडुरंग कुटे, सुभाष कावरे,शेषराव भाई, ऋषिकेश सानप,सांगळे, रामप्रसाद आघाव,राजू नागरे,पप्पू वैद्य,भैया गायकवाड,योगेश देशमुख, विशाल जायभाये,माऊली कागणे, भास्कर आघाव,निवास दराडे,महादू दराडे, हनुमान गीते, मंगेश कुटे,कैलास सांगळे पांडुरंग सांगळे विक्रम सांगळे,नागनाथ सांगळे,सारंग नागरे अमोल गीते इत्यादी उपस्थित होते या कार्यक्रमाचे आयोजन विलास दादाराव आघाव,जगन्नाथ सांगळे यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी व लोकनेते धनंजय मुंडे प्रतिष्ठान यांनी केले होते.

## शनिवारी सौरभ राव, वैद्य तनुजा नेसरी यांच्याशी संवाद

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

प्राचीन संहिता गुरुकुलच्या वतीने दिग्गजांच्या मुलाखती उपक्रमांतर्गत ठाणे महानगरपालिकेचे आयुक्त सौरभ राव व आयुर्वेद अध्यापन व संशोधन संस्थेच्या संचालक वैद्य तनुजा नेसरी यांच्याशी संवाद साधला जाणार आहे. येत्या शनिवारी (ता. १९) दुपारी १ ते ४ या वेळेत टिळक रस्त्यावरील न्यू इंग्लिश स्कुलच्या गणेश सभागृहात हा कार्यक्रम होणार आहे. वैद्य हरिश पाटणकर प्रेरित ज्ञानसंकुल विद्यार्थी संघाच्या वतीने हा कार्यक्रम आयोजित केला जातो. परमपूज्य आनंदनाथ महाराज यांच्या कृपाशीर्वादाने आणि गुरुवर्य वैद्य समीर जमदग्नी यांच्या मार्गदर्शनाखाली प्राचीन संहिता गुरुकुल, केशायुर्वेद आणि कायायुर्वेद परिवाराच्या नवीन संस्थेच्या वास्तूचेही उद्घाटन यावेळी करण्यात येणार आहे. संस्थेच्या नव्या



वास्तूचे उद्घाटन, माजी विद्यार्थ्यांचा सत्कार, वैद्य हरिश पाटणकर यांचे विशेष मार्गदर्शन आणि गुरुकुलच्या पुढील योजनांची घोषणा करण्यात येणार आहे. कार्यक्रमासाठी नोंदणी https://kayayurved-ae0be.web.app/registration या लिंकवर करता येणार असून अधिक माहितीसाठी ७०२८६ ८१६९९ या क्रमांकावर संपर्क साधावा.

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.